पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
dcptfc@mah.gov.in

जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/१८५५५८४ /२०२५ दिनांक - २० /०२/२०२५

## वाहतुक नियंत्रण अधिसुचना

प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत दिनांक २२/०२/२०२५ रोजी मा. केंद्रिय गृहमंत्री, भारत सरकार व मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य व मंत्री ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र रज्य यांचे उपस्थितीत राज्यातील २० लाख लाभार्थ्यांना मंजूरी पत्र देणे व १० लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरणाचा कार्यक्रम श्री शिवछत्रपती क्रिडा संकुल बालेवाडी स्टेडियम येथे आयोजित करण्यात आलेला असून कार्यक्रमास होणारे गर्दीचे अनुषंगाने म्हाळुंगे गाव परिसरातील वाहतुकीमध्ये बदल करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाले आहेत त्याअर्थी मी बापू बांगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### हिंजवडी वाहतूक विभाग

- चांदे-नांदे-म्हाळुंगे गाव ते राधा चौक व राधा चौक ते म्हाळुंगे गाव येण्या-जाण्यास सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना प्रवेश बंद राहील.

➤ पर्यायी मार्ग :- १) चांदे-नांदे येथुन येणारी जड अवजड वाहने ही गोदरेज सर्कल येथुन डावीकडे वळुन माण मार्गे हिंजवडी मार्गे इच्छित स्थळी जातील.
२) बालेवाडी जकात नाका व बाणेर हद्दितुन येणारी जड अवजड वाहने ही राधा चौकातुन उजवीकडे वळुन वाकड नाका मार्गे हिंजवडी मार्गे इच्छित स्थळी जातील.
३) सुस ब्रिज कडुन राष्ट्रीय महामार्गावरुन न्याती शोरुम समोरील पंक्चर येथुन राधा चौकाकडे येणारी जड अवजड वाहने ही बैंगलोर-मुंबई हायवेने वाकड नाका मार्गे हिंजवडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

- बालेवाडी स्टेडीयम म्हाळुंगे कडील मेनगेट समोरील रस्ता हा शितळाई देवी चौक (पुणेरी स्वीट) ते म्हाळुंगे पोलीस चौकी पर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांकरीता बंद राहील.

➤ पर्यायी मार्ग:-१)चांदे- नांदे व म्हाळुंगे गावातुन राधा चौकाकडे जाणारी वाहने ही शितळाईदेवी चौक (पुणेरीस्वीट) येथुन उजवीकडे वळुन म्हाळुंगे पोलीसचौकी येथुन पुढे राधा चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
२) राधा चौकातुन म्हाळुंगे गावाकडे जाणारी वाहने ही म्हाळुंगे पोलीस चौकी येथे डावीकडे वळुन पुढे म्हाळुंगे गाव, चांदे- नांदे व पुढेइच्छित स्थळी जातील.

❖ राधा चौक ते मुळा नदी ब्रिजपर्यंत सर्व्हिस रोडवर (कार्यक्रमास येणारी वाहने व अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून) सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेशबंदी करण्यात येत असुन सदर मार्गावरील वाहने सातारा मुंबई महामार्गाचे मुख्य रस्त्याने इच्छित स्थळी जातील.

वरील प्रमाणे करण्यात आलेला वाहतुक बदल हा दि.२२/०२/२०२५ रोजी दुपारी १२/०० ते रात्रौ २०.०० वाजेदरम्यान आवश्यकतेनुसार (अत्यावश्यक सेवेतील वाहने व कार्यक्रमास येणारी वाहने वगळून) करण्यात येत आहे.

तरी वाहन चालकांनी नमुद केलेप्रमाणे पर्यायी मार्गाचा वापर करावा.

२० /०२/२०२५

( बापू बांगर)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

Scanned with OKEN Scanner

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, तथा जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी हिंजवडी वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड
/- अधिसुचनेचे अनुषंगाने योग्य असे बॅरीकेटींक करुन वाहनचालकांना मार्गदर्शन करणारे फलक लावावे.

Scanned with OKEN Scanner